REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018
UGC APPROVED JOURNAL NO. 48514

# "सोलापूर शहरातील बालकामगार विद्यार्थ्यांमध्ये मराठी विषयातील विविध संकल्पना विकसनासाठी ज्ञानरचनावादी अध्यापन पध्दती राबवताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास"

**डॉ. पांढरे विद्युलता ज्ञा.**
**प्राचार्या, उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पंढरपूर.**

## १. प्रास्ताविक :-

शिक्षण हा सर्वांचा मुलभत हक्क आहे. तरीही आजही भारतीय शिक्षणाच्या सद्यस्थितीत अनेक मुलांना अनेक कारणामुळे शिक्षणापासून वंचित रहावे लागते. अशीच एक भीषण समस्या दिसून येते ती म्हणजे बालकामगार प्रथा, समाजातून याचे उच्चाटन करणे हेतू श्रम रोजगार मंत्रालय भारत सरकार यांच्या राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प, सोलापूर अंतर्गत बालकामगारांकरिता विशेष प्रशिक्षण केंद्रातून अध्यापन करुन त्यांना वयानुरुप समकक्ष वर्गात दाखल करण्याचा प्रयत्न शिक्षक करत असतो. यासाठी ज्ञानरचनावाद अध्यापन पध्दतीतून विद्यार्थ्यांना अध्यापन केले जाते. विद्यार्थ्यांकडे शिकण्याची कला असते आणि विद्यार्थ्यांना स्व अनुभव दिल्याशिवाय तो पूर्णतः कोणतीही गोष्ट शिकणार नाही यासाठी ज्ञानरचनावादी शिक्षणातून बालकामगार विद्यार्थ्यांना घडवण्याचे कार्य करीत असतो.



## २. संशोधनाची गरज :-

ज्ञानरचनावादाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे प्रत्येक मुलाचा, व्यक्तिगत विचार याचे कारण प्रत्येक मूल स्वतंत्र असते. त्याची शिकण्याची पध्दती कृती करण्याचा वेळ वेगवेगळा असतो. त्यामुळे प्रत्येकाला त्याच्या गरजेनुसार संधी मिळणे आणि त्याच्या गरजेनुसार शिक्षण मिळणे आहे. बालकामगार विद्यार्थ्यांना पुर्वानुभवास प्राधान्य भाषेला महत्त्व देणे असे असते. बालकामगार विद्यार्थ्यांसाठी मराठी विषयाचा पाठ्यक्रम विकसित करताना मुलांना समजपूर्वक वाचन करता येत नाही. व्यवहारासाठी आवश्यक असलेले औपचारिक लेखन करता येत नाही म्हणून वाचन - लेखन कौशल्यविषयक ज्ञानाची रचना करणे आवश्यक आहे.

या सर्व घटकांचा विचार करुन संशोधकान बालकामगार विद्यार्थ्यांसाठी ज्ञानरचनावादी अध्यापन पध्दती राबवताना कोणत्या अडचणी येतात याबाबत अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड केली आहे.

## ३. संशोधनाचे महत्त्व :-

१. प्रस्तुत संशोधनामुळे बालकामगार विद्यार्थ्यांना अध्ययन स्तरविषयी माहिती समजेल.
२. प्रस्तुत संशोधनातून बालकामगार विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तर विकसनासाठी ज्ञानरचनावादी उपयोगी ठरेल.
३. बालकामगार विद्यार्थ्यांसाठी ज्ञानरचनावादी अध्यापन पध्दतीतून मराठी विषय अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना ज्ञानरचनावादी अध्यापन पध्दतींची माहिती या संशोधनातून मिळणार आहे.

## ४. शीषर्क -

**"सोलापूर शहरातील बालकामगार विद्यार्थ्यांमध्ये मराठी विषयातील विविध संकल्पना विकसनासाठी ज्ञानरचनावादी अध्यापन पध्दती राबवताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास"**

### ५. संशोधनाची उद्दिष्टे -

१. बालकामगार विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तराच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
२. बालकामगार विद्यार्थ्यांसाठी ज्ञानरचनावादावर आधारित विविध अध्यापन पध्दतीचे विकसन करणे.
३. बालकामगार विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तर विकसनासाठी ज्ञानरचनावादी अध्यापन पध्दतीचे परिणामकारकता तपासणे.
४. बालकामगार विद्यार्थ्यांच्या पूर्व अध्ययन स्तर आणि ज्ञानरचनावादी अध्यापनाच्या परिणामकारकतेची तुलना करणे.
५. बालकामगार विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तर विकसनासाठी विविध उपाययोजना सुचविणे.

### ६. कार्यात्मक व्याख्या -

१. बालकामगार :-

१५ वर्षाखालील जे मूल कोणत्याही प्रकारच्या धोकादायक अथवा बिगर धोकादायक उद्योगात काम करत असेल तो बालकामगार मध्ये गणला जातो.

२. ज्ञानरचनावाद :-

पुर्वानुभवाच्या किंवा पुर्वज्ञानाच्या आधारे जेव्हा व्यक्ति नवीन संकल्पनांची, संबोधाची रचना करते तेव्हा त्यातून अध्ययन घडते यास ज्ञ ाानरचनावाद म्हणतात.

### ७. संशोधनाची व्याप्ती -

**व्याप्ती :-**

या संशोधनात सोलापूर शहरातील राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प सोलापूर अंतर्गत चालवले जाणारे विशेष प्रशिक्षण केंद्राचा विचार केला जाणार आहे. यामध्ये विशेष प्रशिक्षण केंद्रातील बालकामगार विद्यार्थ्यांचा विचार केला जाणार आहे.

**मर्यादा :-**

या संशोधनात मराठी विषय अंतर्गत इतर विषयांचा विचार केला जाणार नाही. या संशोधनात सोलापूर शहरातील राष्ट्रीय बालकामगार विशेष प्रकल्प विशेष प्रशिक्षण केंद्राचा विचार केला जाणार असून जिल्ह्यातील विशेष प्रशिक्षण केंद्राचा विचार केला जाणार नाही.

### ८. संशोधन कार्यपध्दती :-

शैक्षणिक संशोधन पध्दती सदरहू संशोधन समस्या वर्तमानकाळाशी संबंधित असल्याने तसेच विषयाचे स्वरुप उद्दिष्टे लक्षात घेता या संशोधनासाठी संशोधकाने वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दतीची निवड केली आहे.

### ९. संशोधन साधने :-

समस्या सोडवणूकीसाठी विविध प्रकारची माहिती संशोधकाला संकलित करावी लागते. माहितीची संकलन करण्यासाठी शिक्षकासाठी प्रश्नावली प्रकल्प संचालक यांची मुलाखत आणि बालकामगार केंद्राचे निरीक्षण करण्यात आले.

### १०. न्यादर्श -

राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प सोलापूर शहर अंतर्गत राबवले जाणारे एकूण विशेष प्रशिक्षण ४५ केंद्रापैकी १० केंद्राची निवड करण्यात आली.

### ११. नमूना निवड -

यामध्ये सहेतूक पध्दतीने निवड करण्यात आली आहे. (विशेष प्रशिक्षण केंद्राची)

### १२. निष्कर्ष :-

**शिक्षक प्रश्नावली -**

१. १००% मराठी विषयाचे अध्यापन केले जाते.
२. ज्ञानरचनावादी अध्यापन पध्दती वापर ६०% आहे.
३. ४०% शिक्षक concept mapping व पध्दत वापरतात.

४. एकूण केंद्रापैकी स्वतंत्र वर्गखोली कुठेच उपलब्ध नाही.
५. ४०% शिक्षक स्वनिर्मितीतून साहित्य उपलब्ध करुन अध्यापन करतात.
६. ४०% शिक्षक मराठी विषयातील संकल्पना आकलन होण्यासाठी नाविण्यपूर्ण उपक्रम होतात.
७. ४०% शिक्षकाच्या मतानुसार ज्ञानरचनावादी अध्यापनातून विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर सुधार होतो.
८. ज्ञानरचनावाद अध्यापन पध्दतीत ६०% प्रमाणानुसार सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग असतो.

**मुलाखत - (प्रकल्प अधिकारी यांच्या मुलाखतीचे निष्कर्ष)**

राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प सोलापूर अंतर्गत विशेष प्रशिक्षण केंद्रात सर्वच शिक्षक B.Ed. पदवी धारक आहेत ही बाब उल्लेखनीय आहे. ज्ञानरचनावाद अध्यापन पध्दतीचा वापर ६०% प्रमाणात केला जातो. या पध्दतीतून शिक्षण देण्यासाठी प्रकल्पामार्फत कोणतेही साहित्य पुरवले जात नाही. ज्ञानरचनावाद अध्यापनातून शिक्षण विद्यार्थ्यांना समकक्ष वर्गातील अध्ययन स्तर निश्चित करु शकतात.

**निरीक्षण - (बालकामगार विशेष प्रशिक्षण केंद्र)**

१००% केंद्रात मराठी विषयाचे अध्यापन केला जातो. ६०% केंद्रात ज्ञानरचनावाद अध्यापन पध्दती वापर करतात. ६०% शिक्षक स्वनिर्मित साहित्य वापरतात. ज्ञानरचनावादी अध्यापन पध्दती सर्वच विद्यार्थी सहभाग घेतात. ज्ञानरचनावादी अध्यापनात शैक्षणिक साहित्य निर्मिती शिक्षकांनी केली आहे.

उदा. अक्षर कार्ड, शब्द कार्ड, वाक्यपट्टया, फुलपाखरुतून स्वर-व्यंजन, माशाच्या आकारात समानार्थी शब्द इ.

**समारोप -**

ज्ञानरचनावादी पध्दतीने शिकवणे म्हणजे मुलांना ज्ञानरचनावादी पध्दतीने शिकण्यासाठी मदत करणे अशी भूमिका बालकामगार विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या शिक्षकांची असते.